नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २३१ | Issue - 231 | वार मंगळवार दि. ७ जानेवारी २०२५ | Blow- Tuesday Date 7 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### विद्यार्थ्यांसाठी उपोषणाला बसलेल्या प्रशांत किशोर यांना अखेर बिनशर्त जामीन मंजूर

पाटणा : पाटणा येथील गांधी मैदानात अमरण उपेषणाला बसलेले जनसुराज पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांना अटक केल्यानंतर काही तासांनी कुठल्याही अटींशिवाय जामीन मंजूर करण्यात आला आहे. बिहारची राजधानी पटणा येथील गांधी मैदान येथे प्रशांत किशोर हे मागच्या आठवड्यापासून उपोषणाला बसले होते. दरम्यान त्यांना सोमवारी पहाटे ताब्यात घेतल्यानंतर न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

पण किशोर यांनी सशर्त जामीन नाकारल्यानंतर त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले होते. बीपीएससी विद्यार्थ्यांना पाठिंबा म्हणून गांधी मैदान येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ प्रशांत किशोर २ जानेवारी पासून उपोषण करत आहेत.

# पोलिसांच्या वाहनावर नक्षलवाद्यांकडून स्फोटक हल्ला; नऊ पोलीस जागीच ठार!

## छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांचा स्फोट; तीन दिवसापूर्वी सुरक्षा दलांच्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

छत्तीसगड : छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला आहे. सोमवारी पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या एका वाहनाला नक्षलवाद्यांनी स्फोटक यंत्राने उडवलं. या घटनेत आठ पोलीस आणि एक चालक असे एकूण ९ जण शहीद झाले आहेत. एएनआयने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

विजापूर जिल्ह्यातील बेद्रे-कुटू रोडवर हा स्फोट झाला. ५ जानेवारी रोजी (रविवारी) केलेल्या नक्षलविरोधी मोहिमेतून परतत असलेले किमान २० जवान या वाहनात होते. यावेळी नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटात आठ जवान आणि चालकासह एकूण नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

छत्तीसगडच्या बस्तर भागात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी मारले गेले होते. त्यानंतर हा हल्ला करण्यात आला. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवरील दक्षिण अबुझमाड येथील जंगलात शनिवारी संध्याकाळी सुरक्षा दलाच्या जवानांचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेवर असताना चकमक झाली.

रविवारी सुरुवातीला चार नक्षलवादी मृतावस्थेत आढळले, तर आणखी एक मृतदेह नंतर सापडला, असे एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले. दंतेवाडा डीआरजी हेड कॉन्स्टेबल सन्नू करम हे देखील कारवाईदरम्यान शहीद झाले. छत्तीसगडच्या नारायणपूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवरील दक्षिण अबुजमढ जंगल परिसरात नक्षलविरोधी कारवाई करण्यात आली, असे आयजी बस्तर यांनी सांगितले. हे डढक्रने नारायणपूर, दंतेवाडा, जगदलपूर आणि कोंडागाव जिल्ह्यातील डीआरजी संघांच्या समन्वयाने केले.

**शुक्रवारी तीन नक्षलवादी ठार**

तत्पूर्वी, शुक्रवारी छत्तीसगडमधील गरीबीबंद जिल्ह्यातील कंदेशर गावात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. चकमकीच्या ठिकाणाहून शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.



## आसाममधील कोळसा खाणी भीषण दुर्घटना, अनेक कामगार अडकल्याची भीती; बचावकार्य सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आसाम : आसाममधील दिमा हासाओ जिल्ह्यातील एका कोळसा खाणीत भीषण दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी सकाळी येथील एका कोळसा खाणीत पाणी शिरल्याने अनेक कामगार १२ तासांपेक्षा अधिक काळापासून खाणीत अडकले आहेत. दिमा हासाओचे पोलिस अधीक्षक मयंक कुमार यांनी खाणीत अडकलेल्या कामगारांची निश्चित संख्या माहिती नसल्याचे म्हटले आहे. मात्र स्थानिक रिपोर्टनुसार कामगारांची संख्या दहापेक्षा जास्त असू शकते.



ही घटना दिमा हसाओ जिल्ह्यातील उमारांग्सोच्या कलामती भागात घडली आहे. दिमा हसाओ हा जिल्हा डोंगराळ भाग आहे. दुर्घटना घडली तो भाग अत्यंत दुर्गम असून जिल्हा मुख्यालय हाफलाँग पासून सुमारे १५० किलोमीटर अंतरावर आहे. इतकेच नाही तर एसपी, जिल्हाधिकारी आणि इतर वरिष्ठ सरकारी अधिकारी रात्री साडेआठ पर्यंत घटनास्थळी पोहचले नव्हते.

ही घटना सकाळी घडली असून आम्हाला याची माहिती मिळताच बचाव पथके तेथे दाखल झाली. सुमारे सात तासांपासून बचावकार्य सुरू आहे, असे एसपींनी संध्याकाळी ७ वाजता इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितले. बचावकार्य संथगतीने सुरू असून दोन मोटार पंपांच्या मदतीने शेकडो फूट खोल खाणीत भरलेले पाणी काढण्याचे काम सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

**लष्कराची मदत मागितली**

आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी घोषणा केली की, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल आणि राज्य आपत्ती निवारण दल या दुर्घटनास्थळी बचाव कार्यात मदत करण्यासाठी दाखल होत आहेत. तसेच त्यांनी सांगितले की, खाणीत अडकलेल्यांना बाहेर काढण्यासाठी लष्कराची मदत मागण्यात आली आहे. ही दुर्घटना घडली ते ठिकाण आसाम आणि मेघालय यांच्या सीमेजवळ आहे. याच ठिकाणी २०१८मध्ये भीषण खाण दुर्घटना घडली होत. ज्यामध्ये १५ कामगारांचा पाणी भरलेल्या रॅट होल खाणीत अडकल्याने मृत्यू झाला होता.

## मुंडेंच्या राजीनाम्यासाठी सर्वपक्षीय दबाव, राज्यपालांची भेट; न्यायालयीन चौकशीवर प्रश्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय गुंतलेले असल्याने त्यांचा राजीनामा घेण्यात यावा. हत्येत सहभागी असलेल्या सहआरोपींवर खुनाचा गुन्हा नोंदविण्यात यावा. त्याचप्रमाणे बीड आणि परभणी या दोन्ही प्रकरणांत न्यायायलयीन चौकशीचे आश्वास देऊनही अद्याप न्यायाधीशांची नेमणूक झालेली नाही. न्यायाधीशांची नेमणूक करून याची तत्काळ चौकशी यावी, या मागणीसाठी सर्वपक्षीय नेत्यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेतली.

मस्साजोगमधील सरपंच देशमुख यांची हत्या, परभणीमध्ये पोलीस कोठडीत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूमुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था ऐरणीवर आली आहे. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांनी सर्वसामान्यांचा आक्रोश पोहोचविण्यासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेत त्यांना निवेदन दिले.

विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार, भाजपचे आमदार सुरेश धस, स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष संभाजीराजे भोसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड, संदीप क्षीरसागर, शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे हे या भेटीवेळी उपस्थित होते.

बीड जिल्ह्यातील बीड, धारूर, अंबाजोगाई व परळी पोलीस ठाण्यांमध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जरांगे पाटील यांनी परभणी येथील मोर्चामध्ये अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात व सामाजिक तेढ निर्माण करणारे, घरात घुसून मारू, अशी धमकी देणारे वक्तव्य केल्याचा आरोप तक्रारीमध्ये करण्यात आला आहे. गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी परळी, धारूरमध्ये धनंजय मुंडे यांच्या समर्थकांकडून ठिय्या आंदोलन करण्यात आले.

देशमुख हत्याप्रकरणातील तपासावर परिणाम होऊ नये, यासाठी चौकशी होईपर्यंत मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा. बीडमध्ये खंडणी, अपहरण आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांची निष्काळजी आणि पक्षपातीपणामुळे बीड जिल्ह्यात अशांतता पसरली आहे. राज्यभरातील सार्वजनिक सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे या निवेदनात शिष्टमंडळाने म्हटले आहे.

## रुपयाची घसरगुंडी सुरूच; प्रति डॉलर ८५.८४ चा नवीन तळ


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: भारतीय चलन अर्थात रुपयाच्या विनिमय मूल्याने सलगपणे आठव्या सत्रात प्रति डॉलर नवीन सार्वकालिक नीचांकाची सोमवारी नोंद केली. शुक्रवारच्या बंद पातळीच्या तुलनेत आणखी चार पैशांच्या घसरणीसह त्याने ८५.८४ असा नवीन तळ गाठला.

एकीकडे जागतिक स्तरावर मजबूत बनत असलेली डॉलर, तर दुसरीकडे परकीय गुंतवणूकदारांनी देशांत गुंतविलेल्या भांडवलाची तीव्र स्वरूपात सुरू असलेली माघार याचा रुपयाच्या विनिमय मूल्यावर विपरित ताण पडत आहे. ही निरंतर सुरू असलेली घसरण पाहता, आयातदारांकडून डॉलरच्या संचयाचा कल वाढीला लागला असून, त्यातून रुपया आणखीच कमजोर होत चालला आहे. रिझर्व्ह बँकेकडून संभाव्य हस्तक्षेपामुळे रुपयातील मूल्य झड ही मर्यादित राखली गेली. अन्यथा डॉलरमागे ८६ च्या नीचांकापर्यंत रुपया वेगाने गडगडताना दिसला असता, असे चलन बाजारातील व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. ट्रम्प प्रशासनाकडून अमेरिकेत २० जानेवारीला सूत्रे हाती घेतली जातील, तोपर्यंत रुपया डॉलरमागे ८६ ची पातळी राखेल, असा रिझर्व्ह बँकेकडून प्रयत्न राहिल, असा व्यापाऱ्यांचा होरा आहे. ट्रम्प प्रशासनाच्या आर्थिक धोरणांबाबत जोपर्यंत चित्र सुस्पष्ट होत नाही, तोवर डॉलरच्या मजबुतीचा क्रमही सुरू राहण्याचे कयास आहेत.

## एचएमपीव्ही व्हायरसमुळे घाबरुन जाऊ नका, कपोलकल्पित माहितीवर विश्वास ठेवू नका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : एचएमपीव्ही व्हायरसने चीनमध्ये सध्या मानवी मेटान्यूमोव्हायरसचा (एचएमपीव्ही) उद्रेक सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर देशात देखील खबरदारी घेतली जात आहे. यादरम्यान इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (खउचठ) नेटवर्क लॅबोरेटरीजच्या नियमीत तपासणीदरम्यान किमान दोन एचएमपीव्हीचे रूग्ण आढळून आले आहेत. या दरम्यान या संसर्गासंबंधी केंद्र सरकारने काही महत्त्वाची माहिती दिली आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस यांचं आवाहन

भारतातील या व्हायरससंबंधी परिस्थितीबद्दल माहिती देताना केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये एचएमपीव्ही भारतासह जागतिक स्तरावर आधीपासूनच प्रसारित झाला आहे आणि विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसन आजारांची प्रकरणे नोंदवली गेली आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. या संक्रमणावर लक्ष ठेवले जात असताना भारतातही याची दोन प्रकरणे आढळून आली आहेत. या दोनही रुग्णांनी कुठलाही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही, म्हणजेच भारतात आढळलेल्या संक्रमणांचा चीनमधील संसर्गाच्या वाढलेल्या प्रकरणाशी काहीही संबंध नाही, असेही या निवेदनात सांगण्यात आले आहे. दरम्यान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्हायरसमुळे घाबरु नका असं आवाहन केलं आहे.

एचएमपीव्ही या व्हायरसला घाबरण्याचं कारण नाही. प्राथमिक माहितीनुसार हा व्हायरस नवीन नाही, यापूर्वीही हा व्हायरस आला आहे. पुन्हा एकदा या व्हायरसचा चंचूप्रवेश होताना दिसतो आहे. यासंदर्भात जी नियमावली आहे ती जाहीर होईल. केंद्र सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने राज्यांना माहिती देण्याचं ठरवलं आहे. या व्हायरसला घाबरुन जाण्याची आवश्यकता नाही. या संदर्भातल कपोलकल्पित माहिती देऊ नका. जी अधिकृत माहिती येईल ती माहितीच द्यावी. आरोग्य विभागाची बैठक झाली आहे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाबरोबर बैठक चालू आहे, असं सांगितलं आहे.

ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) सामान्य सर्दी आणि कोरोना व्हायरससारखी लक्षणे दर्शविते. त्यामध्ये खोकला, ताप व सर्दी यांसारख्या लक्षणांचा समावेश आहे. कोविड-१९ नंतर पाच वर्षांनंतर ह्युमन मेटापन्यूमो व्हायरस (एचएमपीव्ही) चा प्रादुर्भाव चीनच्या अनेक भागांमध्ये वाढत आहे, ज्यामुळे अधिकारी चिंतेत आहेत. परिणामी, अधिकारी लोकांना मास्क घालणे आणि वारंवार हात धुणे यांसारखी खबरदारी घेण्याचे आवाहन करीत आहेत.

## आरोग्य व्यवस्था अलर्ट मोडवर

### केंद्रीय आरोग्य मंत्र्याचे नागरिकांना आवाहन

# एचएमपीव्ही हा नवीन विषाणू नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : कोरोना महामारीनंतर पुन्हा एकदा चीनमधून एक नवीन व्हायरसबद्दल बातम्या समोर येत आहेत. यानंतर जगभरातील नागरिकांमध्ये चिंतेचा लाट पाहायला मिळत आहे. चीनमध्ये क्वझत नावाच्या एका नव्या विषाणूचा फैलाव होऊ लागला असून मोठ्या प्रमाणावर या विषाणूची लागण चीनमध्ये नागरिकांना झाल्याचं सांगितलं जात आहे. भारतात देखील याचे आतापर्यंत तीन रुग्ण आढळून आले आहेत. यादरम्यान देशाचे आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी एका व्हिडीओ संदेशात लोकांना घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे म्हटले आहे.

एचएमपीव्ही विषाणू हा काही नवीन विषाणू नाही आणि याला घाबरून जाण्याची काही आवश्यकता नाही असे नड्डा आपल्या निवेदनात म्हणाले आहेत. तसेच सरकार सध्या परिस्थितीवर लक्ष्य ठेवून असल्याची प्रतिक्रिया देखील केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांनी दिली आहे.

जेपी नड्डा म्हणाले की, आरोग्य विषयक तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे की एचएमपीव्ही हा काही नवीन विषाणू नाही. हा २००१ मध्ये आढळून आला होता आणि अनेक वर्षांपासून जगभर पसरत आहे. एचएमपीव्ही हा विषाणू श्वास घेताना हवेचे माध्यमातून हा विषाणू पसरतो आणि हा सर्व वयाच्या नागरिकांना होऊ शकतो.



हा विषाणू हिवाळ्याच्या दिवसात जास्त प्रमाणात पसरतो.

पुढे बोलताना आरोग्य मंत्री नड्डा म्हणाले की, चीनमध्ये एचएमपीव्हीचे रुग्णांबद्दल रिपोर्ट समोर आल्यानंतर आरोग्य मंत्रालय, आयसीएमआर आणि राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र चीनसह शेजारच्या देशांमधील स्थितीवर लक्ष ठेवून आहे. पुढे ते म्हणाले की, जागतिक आरोग्य संघटना (थकज)ने घटनेची दखल घेतली आहे आणि लवकराच त्यांचा रिपोर्ट ते आपल्याबरोबर शेअर करतील.

नड्डा म्हणाले की, आयसीएमआरने श्वसनासंबंधीच्या व्हायरसच्या आकड्यांचे विश्लेषण केले आहे आणि भारतात कोणत्याही सामान्यत: आढळणाऱ्या श्वसनासंबंधी विषाणूजन्य आजारांमध्ये म्हणजेच इन्फ्लूएन्झा सारखे आजार किंवा गंभीर तीव्र श्वसनाचे आजार यांच्यात कुठलीही वाढ झालेली आढळून आलेली नाही.

केंद्रीय मंत्री नड्डा यांनी सांगितले की, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी ४ जानेवारी रोजी आरोग्य सेवा महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त मॉनिटरिंग गटाची बैठक झाली आहे. एचएमपीव्ही व्हायरस संक्रमणासंबंधी देशातील आरोग्य संस्था आणि सर्व्हेलन्स नेटवर्क सतर्क आहे, कोणत्याही आगामी आरोग्य विषय आव्हानांना प्रत्युत्तर देण्यासाठी तयार आहेत. त्यांनी काळजी करण्याचे काही कारण नाही, आम्ही परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहोत असेही नड्डा यांनी यावेळी सांगितले.

### भारतात तीन रुग्ण आढळले

**आतापर्यंत या विषाणूची लागण झाल्याच्या तीन घटना भारतात समोर आल्या आहेत. यापैकी दोन प्रकरणे ही बंगळुरू येथे आहेत तर तिसरे प्रकरण हे गुजरातच्या अहमदाबाद येथे समोर आले आहे. तीनही लहान मुले आहेत आणि त्यांचे वय एक वर्षापेक्षाही कमी आहे आणि तिन्ही रूग्णांची स्थिती स्थिर असून एकाला डिस्चार्ज देखील देण्यात आला आहे. तीनही मुलांनी किंवा त्यांच्या कुटुंबियांना भारताबाहेर प्रवास केलेला नाही.**

## संपादकीय....

### भ्याड हल्ला

छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी मोठा हल्ला केला आहे. सोमवारी पोलीस कर्मचाऱ्यांना घेऊन जाणाऱ्या एका वाहनाला नक्षलवाद्यांनी स्फोटक यंत्राने उडवलं. या घटनेत आठ पोलीस आणि एक चालक असे एकूण ९ जण शहीद झाले आहेत. विजापूर जिल्ह्यातील बेद्रे-कुटू रोडवर हा स्फोट झाला. ५ जानेवारी रोजी (रविवारी) केलेल्या नक्षलविरोधी मोहिमेतून परतत असलेले किमान २० जवान या वाहनात होते. यावेळी नक्षलवाद्यांनी आयईडी स्फोट घडवून आणला. या स्फोटात आठ जवान आणि चालकासह एकूण नऊ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. छत्तीसगडच्या बस्तर भागात सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत पाच नक्षलवादी मारले गेले होते. त्यानंतर हा हल्ला करण्यात आला. नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमेवरील दक्षिण अबुझमाड येथील जंगलात शनिवारी संध्याकाळी सुरक्षा दलाच्या जवानांचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेवर असताना चकमक झाली. रविवारी सुरुवातीला चार नक्षलवादी मृतावस्थेत आढळले, तर आणखी एक मृतदेह नंतर सापडला, असे एका अधिकाऱ्याने पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले. दंतेवाडा डीआरजी हेड कॉन्स्टेबल सन्नू करम हे देखील कारवाईदरम्यान शहीद झाले. छत्तीसगडच्या नारायणपूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवरील दक्षिण अबुजमढ जंगल परिसरात नक्षलविरोधी कारवाई करण्यात आली, असे आयजी बस्तर यांनी सांगितले. हे ड्ढक्र ने नारायणपूर, दंतेवाडा, जगदलपूर आणि कोंडागाव जिल्ह्यातील डीआरजी संघांच्या समन्वयाने केले. तत्पूर्वी, शुक्रवारी छत्तीसगडमधील गरीबीबंद जिल्ह्यातील कंदेशर गावात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. चकमकीच्या ठिकाणाहून शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

# पत्रकारितेचे वर्तन हेच पत्रकारितेचे रक्षण

# ते आले अभिव्यक्ती स्वातंत्र्य हिरावून घेऊ लागले.?

महाराष्ट्रातील तीस वर्षांपूर्वीच्या पत्रकारितेचे अंतरंग तपासताना अनेक निष्कर्ष हाती येतात. पत्रकारिता ही प्रबोधनाचे क्षेत्र आहे .पत्रकारिता जनसामान्यांच्या आक्रोशाचा आ-वाज आहे. पत्रकारिता ही समस्यांचे शासन दरबारी कथन आहे. पत्रकरिता वास्तवता आणि जीवन व्यवहाराचा तो आरसा आहे. ते प्रतिबिंब आहे .

या सर्वहून पत्रकारिता समाजा-तील सर्व व्यवहाराचे लिखित रूप आहे म्हणून समाजातल्या विकास, विकार विधायकता व विध्वंसकता या सर्व सम ाज प्रवृत्तीचे अंतरंगाचे वेध घेणे म्हणजे घडलेल्या घटनांना शब्दबद्ध करणे आणि वर्तमान चा इतिहास म्हणजे पत्रकारिता होय वर्तमान चा इतिहास पत्रकार लिहीत असतात याच्

आकलन पत्रकारांनी कितपत असते हा एक प्रश्नच आहे पत्रकार इतिहास साक्षी असतात पत्रकार वर्तमानाच्या विध्वंसचे साक्षी असतात विधायक तिचे साथी आणि सोबती असतात पत्रकार समाज निर्माण असे यथामती ते कार्य करीत असतात अशी ही इतिहास साक्षी पत्रकारिता कशी आहे हे सहा जानेव-ारी २०२५ रोजी समजावून घेताना स्व परीक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही.

आपण स्वीकारलेली पत्रकारिता ही बातमी इतपत सीमित नाही हे कळण्यातच पत्रकारितेची दोन दशके निघून गेले आपली पत्रकारिता हा व्यापक निष्ठेचा आणि बांधिलकीचा तो आदर्श आहे, हे व्यापकपणे सर्वांना कळतेच पण कौतुक व आळस यामध्ये अडकलेली पत्रकारिता ही आत्मगौरव आणि समाज जाती अनुनय अडकणारे पत्रकार आणि बातमीदार यांचे प्रमाण सर्वत्र जास्त आहे.

अर्ध साक्षर समाजाच्या आदराला सतत अग्रभागी असणारे पत्रकार ही सामाजिक निष्ठेचे लेखन करतात असे क्षणभर मानले तरी वास्तवात आढळून येत नाही पक्षपात अतिरंजीत विरोधी बातम्या आणि शत्रुत्व हितसंबंधाचे राजकारण आणि धमक्या यांनी आजची पत्रकारिता पुरेपूर व्यापलेली आहे आपण समाजातील जनसामान्यापेक्षा मोठे आहोत आपली लेखनाची संधी हेच आपली प्रतिष्ठा आहे अशा भ्रमात राहून पत्रकारितेचा धर्म किंवा वृत्तनिष्ठा ही प्रदूषित करणाऱ्या या क्षेत्रातील तमाम नाती बांधवांचे वर्तन ही एक चिंतेची गोष्ट आहे ही आत्मपरीक्षणाची गोष्ट आहे. आत्मपरीक्षणाचा अभाव हा पत्रकारितेतील बेदरकार वर्तनाचा कायम टिकून राहिलेला दुर्गुण आहे प्रस्तुत कार्यकर्ते एवं पत्रकार आहे त्याला जबाबदार आहे समाज जीवनातील शिक्षण पर्यावरण भूक दारिद्र्य आरोग्य जातीय संघर्ष दंगली या व्यापक विषयांना दीर्घकाळच्या तीस वर्षाच्या पत्रकारितेत आपणाला न्याय देता आलेला नाही आपण फाईट अगेन्स करप्शन या एकाच हेतूने भूखंड माफिया वाळू माफिया यांच्या कुलंगड्या बाहेर काढत राहिलं परंतु विकास पत्रकारितेच्या व्यापक सम ाजजीवनाच्या लाभदायी प्रश्नांना आपण खूप न्याय देऊ शकलो नाही याची सतत खंत वाटते अपप्रवृत्ती विरुद्धची पत्रकारिता करणे हे हा व्यक्तिगत संघर्ष उद्भवून घेणे असे इथे मानले जाते पत्रकार दिला निरपेक्ष वर्तनाचा गुणधर्म असायलाच हवा व्यक्ती हितसंबंध पद जात धर्म या पलीकडे जाऊन वास्तवता अनेक घटनांचा अंतरंग याचा पर्दाफाश करण्यास बद्दलची जिद्द ही पत्रकारितेत किती निर्माण होते हा एक प्रश्नच आहे?

प्रस्तुत पत्रकाराच्या संघर्षाचे अनेक नमुने कथन करणे इथे योग्य नाही पण ९० उत्तर काळातील पत्रकारिता ही गुन्हेगारी वर्तनात समाजजीवनाच्या व्यापक गुणामुळे ती सतत प्रत्येक दशकात बदलत गेले बातमी त्यातील विचार त्यातील घटना चे सत्य त्यातील आटोपशीरपणा आणि वार्तांकनाचे सम्यक भान ठेवण्याची काळजी घेण्याची वृत्ती नवद उत्तर काळातील पत्रकारितेत होती राजकारणाची बदलती पिढी आणि त्यांच्या वृत्ती आणि प्रवृत्ती याचे प्रतिबिंब पत्रकारितेत पडत गेले समाजातील सर्वच विचारांचा परिणाम पत्रकारितेवर होत असतो.

हे बिचारे वाचक यांना कितपत कळते हाही एक मोठा प्रश्नच आहे पत्रकारिता हे एक राजकारण आहे पत्रकारिता आहे गुन्हेगारीच्या सम र्थनाचा व्यापक शिस्तबद्ध प्रयत्न आहे पत्रकारिता हा नारायणी धर्म आहे

पत्रकारिता ही ज्ञान सभ्यता ही विकास आग्रह वृत्ती साहित्य संगीत या क्षेत्राच्या वार्तांकनाची गरज म्हणजे पत्रकारिता ही व्याख्या पत्रकारितेतून २०१० नंतर संपुष्टात आली आहे पत्रकारिता हे व्यक्ती महात्म्य अर्थातच प्रोडक्शन पर्सनॅलिटी नेते तयार करणे कार्यकर्ते तयार करणे आणि सूर्याची पिल्ले जन्माला घालणे असे एक पत्रकार येथे धूर्त प्रयत्न सतत चालू असतो पत्रकारितेत विषमता नसते पत्रकारितेत धार्मिकता प्रबोधनाच्या अंगाने संस्कार सुवचने आणि प्रवचने यांच्या निमित्ताने पत्रकारिता धार्मिकतेचे प्रचार कार्यकर्ते ज्योतिष अंधश्रद्धा आणि आकडे खेळ हे पत्रकारितेचे मोठे प्रतिसाद क्षेत्र आहे याला कोणतेही वृत्तपत्र अप वाद नाही

छोट्या सावल्यांचा बुटक्या म ाणसांचा बुटक्या नेत्यांचा हा समाज उंच उंच मोठा होऊ इच्छितो म्हणून अभिनंदनच्या वाढदिवसाच्या विकास वार्तांच्या जॅकेट घातलेल्या वर्तम ानपत्राच्या पुरवण्या हे पत्रकारितेचे सामान्य वाचकाचा स्वायत्त अधिकार चीरडून त्याला सरंजांम दाडगे जात दांडगे गुन्हेगार यांची सत्य जीवन कथा वाचायला लावण्याचा पुरवण्याचा उद्य-ोग हे आजच्या पत्रकारितेतील फार मोठे प्रदूषित वाचन पर्यावरण पत्रकारितेने तयार केले आहे. या संकटाचा विचार वाचक एकटे करू शकत नाही.

गुन्हेगारी आणि पत्रकारिता ही नेहमी एकमेकापासून दूर असायला हवी जगभरच्या पत्रकारितेत ही किम ान शिस्त पाळली जाते त्यामुळेच जगातील आविष्कार स्वातंत्र्यासाठी अकरा अकरा वर्षे तुरुंगात राहणारे पत्रकार पाहावयास मिळतात भारतीय पत्रकारितेत महाराष्ट्र देशी गुन्हेगारी आणि पत्रकारिता राजकारणी आणि पत्रकार यांच्या संबंधाचे अंतरंग मांडणे म्हणजे पत्रकारिता द्रोह करणे स्वतःच्या क्षेत्राबद्दल गुन्हेगारी वर्तन करणे आणि रोष ओडवून घेणे. महाराष्ट्र देशी २०१० नंतर सर्व क्षेत्रातील व्यभिचारी निष्ठा जशी वाढत गेली ती ठरवून वाढवण्यात आली तसतसा आगरकरांचा महाराष्ट्र डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारिता महाराष्ट्र आचार्य जांभेकर यांच्या पत्रकारितेचा सम्यक धर्म पालन करणारा महाराष्ट्र केसी ठाकरे दिनकरराव जवळकर या इतिहासकालीन कितीतरी स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्त यांच्या पत्रकारितेचे महाराष्ट्र देशी धिंडवडे निघत असल्याचे पाहावयास ऐकावयास मिळते.

पत्रकारिता हे अंतर सुरक्षित राखून आज वर्तन करत असलेली दिसत नाही सुरक्षित अंतर म्हणजे सर्व प्रकारच्या लब्ध प्रतिष्ठितांच्या मांडीवर जाऊन बसणे त्यांच्याशी हात मिळवणी करून सूर्याची पिल्ले स्वतः होण्याचा प्रयत्न करणे असे अनेक प्रकारचे वर्तन महाराष्ट्र देशी पत्रकार येथे आढळून येते आजची पत्रकारिता हनी हंटिंग ते एनजीओ टेंडर ते बिल्डर लाभ येथील भागीद-ारी हॉटेलिंगच्या निर्माणात सहभाग शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्याच्या सुपाऱ्या आणि मंत्र्यांच्या मंत्रिपदासाठी सेटिंग लावणारे बाळशास्त्री जांभेकर यांची ही आपण काय करीत आहोत हे त्यांना कळत नसलेली प्रभू येशु ही त्यांची बाळे सतत पाहावयास मिळत आहेत.

एकूणच वाचक समाज विविध सम ाजातील ज्ञान शाखा क्षेत्रे यांना वास्तव-ताच नको आहे यांना अतिरंजीत स्व समर्थनाच्या मदत करणाऱ्या पत्रकारितेची गरज खूप वाटू लागली आहे त्यामुळे इथे भ्रष्टाचार गुन्हेगारी जाती अत्याचार दारिद्र्य दंगली आणि सर्व प्रकारच्या अन्वेषणाला दिशाभूल करणारी पो-लीस यंत्रणा या सर्वांच्या वर्तनाला आजची पत्रकारिता जबाबदार नाही का? स्वतःसाठी प्रश्न आपण विचारला तर वेदनादायक अवस्था स्वतःची होते ही अस्वस्थ वाढत जाते भवताल हा भयकाल आहे भवताल हा अन्याय काल आहे भवताल हा असत्यकाला आहे. नेरेतिव्ह सतत रचणारा व पुढे जाणाऱ्या कालखंड आहे व्यक्तीच्या वीस्मरण व भीती बाळगण्याच्या मानसिकतेचा गैरफायदा घेऊन हा भवताल व्यापून राहिला आहे या सगळ्या विपरीत काळात सामान्यांना व्यथा वेदनाची असलेली बोंबा मारण्याची चावडीच अत्याचार करणाऱ्यांनी ताब्यात घेतली आहे त्यामुळे महाराष्ट्र देशी आदर्श पत्रकारितेचे ढोल वाजत राहतील आणि पीडित अत्याचारी शोषित वंचित यांना अत्याचाराच्या खाईत सतत लोटले जाईल असा भय्यकाळ लवकर जाईल अशी आशा बाळगणे हे पण एक आत्म परीक्षण उत्तर काळातले वर्तन आहे.

एकूणच गौरवाच्या आनंद दिवशी अशी नकारवादी आत्मपरीक्षणवादी भूमि का मांडणे हे कोणीच मान्य करणार नाही हे टीकास्पदच ठरवेल पण पत्रकारिता वर्तमानाचा इतिहास असतो ते आले सर्वांना मारून गेले तेव्हा आम्ही पत्रकार गप्प बसलो त्या आम्हासमाराव्यास आले तेव्हा आमच्यासाठी कोणीच नव्हते अशी शेवटची कामगार शेतकरी शेतमजूर दलित वंचित अल्पसंख्यांक यांना मारत सुटलेल्या या अत्याचारी व्यवस्थेतल्या फाशीवाद्यांना जर आजच्या पत्रकारितेने रोखले नाही ते धैर्य दाखवले नाही तर फाशीवाद्यांचे शेवटचे बळी ही पत्रकारितेची वेळ आली आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही.

उद्याचे भविष्य हा विधायक आ-पोआपवाद नसतो जिथे वर्तमानात विधायकता नाही निरपेक्ष विचार नाही निष्पक्षपातीपणा नाही जातिविनपणा नाही धर्मउन्माद रोखला जात नाही भ्रष्टाचारी हातांना लगाम घातला जात नाही लोकशाहीच्या छोट्या छोट्या अधिकारावर बसलेल्या तुकड्यांच्या या नेता बाबू झोला यांना रोखन्याचे धैर्य दाखवण्याची इच्छा नाही प्रयत्न नाहीत अशी महाराष्ट्र देशी पत्रकारिता आदर्श होईल आणि जांभेकरांच्या आदर्शला, स्वप्नवादाला ती पात्र ठरेल असा भाबडा विचार मनात येणे म्हणजे महाराष्ट्र देशी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आत्मघात जवळ आलेला असताना गप्प बसण्यासारखे आहे आणि स्वतः अभिव्यक्ती स्वातंत्र्य गमावून इतिहास मागे नेणाऱ्या धर्मवर्तन म्हणजे धर्मरक्षण या वंशवादी राष्ट्राच्या निर्माण कार्याला मदत करण्यासारखे आहे त्यांचे म्हणणे आहे आजचे धर्मवर्तन हे उद्याचे राष्ट्ररक्षण आहे यामध्ये थोडा बदल करून असे म्हणता येईल आजचे पत्रकारितेचे छोटे छोटे निस्वार्थी निर्भय व विचार वर्तन व लेखन वर्तन वर्तन वाढत राहील तरच उद्याची आदर्श पत्रकारिता याचे संरक्षण होईल आजच्या पत्रकारितेचे वर्तन हे उद्याच्या आदर्श पत्रकारितेचे संरक्षण हा हिंदुत्वाचा मंत्र महाराष्ट्र देशी पत्रकार पाळतील आणि सत्यमेव जयते च्या ऐवजी तत स्व धर्म जयते हे फाशीवाद्यांनी नवे वचन त्रिम ूर्ती सिंहाच्या राष्ट्रीय प्रतीकांच्या जागी आणलेले आहे ते समजावून घेतले तर आजची पत्रकारिता तत् स्व धर्म जयते अशी इतिहासातील नावांच्या आणि खोट्या कथनाच्या दिशेने राष्ट्र निश्चित घेऊन जाईल आणि तिथे अभिव्यक्ती स्वातंत्र्याची निराश भूमी अवतीर्ण होईल का?

असे भवतालाच्या अनुभवावरून भूतकाळातील बदलत्या वृत्तस्त पत्रकारितेतून वाटून राहते.

**– शिवाजी राऊत**
**सातारा**

## मैंदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेच्या वतीने पत्रकाराचे सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मैंदर्गी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेत दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निम्मित ग्रामीण भागातील पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री शिव-चलेश्वर देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष तुकप्पा नागुर व ज्येष्ठ पत्रकार नागेश भंगर्गी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी यांनी प्रास्ताविकातून बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

यावेळी ग्रामीण भागा-तील कन्नड व मराठी दैनिकाचे प्रतिनिधी पत्रकार बसवराज म सुती नागेश भंगर्गी अनिल कापसे औदुंबर चव्हाण. आदीचा शाल श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला

या कार्यक्रमास सुरेश पाटील. हुव्वानंद सलगर बसवराज हिप्परगी रमेश जुजगार गुरुलिं-गप्पा शिवणगी आदी शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते

## मानव सेवा फाऊंडेशनच्या वतीने पत्रकार बांधवांचे सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : जनतेच्या न्यायहक्कासाठी लढणारे सामाजिक, आर्थिक,राजकीय व न्यायासाठी लढा देणारे अक्कलकोट तालुक्यातील पत्रकार बांधव व पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष कमलाकर सोनकांबळे,सचिव विश्वनाथ चव्हाण, पत्रकार बसवराज बिराजदार, पत्रकार निगप्पा निंबाळ, पत्रकार समाधान अहिरे या सर्व मान्यवरांचे संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आले,

या वेळी संस्थेचे अध्यक्ष दत्ता कांबळे, बोरोटी सरपंच अशोक ढंगापुरे, भाजपा अनु.जाती तालुका अध्यक्ष निजप्पा गायकवाड, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक इरंण्णा दसाडे, उद्योजक शंकर रजपूत, ग्रामसेवक अभिमन्यू ताड ,ग्रामसेवक सोमनाथ खराडे, ग्रामसेवक गुरव सर, सामाजिक कार्यकर्ता संतोष राठोड, ब्यागेहल्लीचे सरपंच रवी गायकवाड ,कृष्णा धोडमनी व आदी कार्यकर्ते उप-स्थित होते.



**८३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

## विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार विद्यार्थ्यांनी आपले चारित्र्य बनविले पाहिजे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फ ुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने २९ डिसेंबर २०२४ ला फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या जनसंपर्क कार्यालयात ८३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. रजनीगंधा राजूरकर म्हणाल्या की फुले शाहू आंबेडकराईट विचारधारा स्थापित करण्यासाठी आपण प्रयत्नशील असायला हवे. समाजात सक्षम नेतृत्व उपलब्ध नसल्याने, समाज दिशाहीन होत चालला आहे. करिता नवयुवकांनी पुढे आले पाहिजे.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले केवळ विद्या असून चालत नाही तर त्याला करुणेची जोड असावी लागते, जेणेकरून त्याला कसाई होण्यापासून वाचविता येईल. क्रोधाला अक्रोधाने जिंकावे लागते. राग हा



द्वेषमूलक व प्रेममुलक असतो. तत्त्वाशी तडजोड न करता मार्गक्रमण करावे. प्रतीक पंचशील म्हणाले की, १४ ऑक्टोबर १९५६ च्या प्रबुद्ध भारत ने प्रकाशित केलेल्या दीक्षा विशेषांकानुसार चालत राहिले पाहिजे. इंजिनिअर भास्कर म्हस्के म्हणाले की, बदलत्या शैक्षणिक पद्धतीत राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांना लुटले जात आहे. महापुरुषांनी प्रवाहाच्या विरोधात कार्य केले आहे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, आपण मुलांना विचारांकडे वळवू शकलो नाही. हे खेदाने नमूद करावे लागते. आज लासूर स्टेशनला कार्यशाळा घेण्यात आली. त्याप्रमाणे इतरही भागात अशा कार्यशाळांचे आयोजन केले पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, जे योग्य दिश-ेने काम करतात तेच अजरामर होतात. शिक्षित स्त्री आपल्या कुटुंबाचा उद्धार करू शकतो म्हणून महिलांना शिक्षित केले पाहिजे. सुभाष ठोकळ म्हणाले की, माणूस प्रबुद्ध होऊ नये, आंबेडकराईट होऊ नये, असे शिक्षण दिले जात आहे. शिकलेली माणसे संघटीत होऊन विकास करू शकतात म्हणून शिक्षणाचे अवमूल्यन केले जात आहे. सत्ता ही सर्व समस्यांची गुरूकिल्ली आहे. करिता योग्य प्रतिनिधी सत्तेत पाठविले पाहिजेत. प्रमुख वक्त्या प्रा. मंगला झिने मॅडम म्हणाल्या की, नागसेन जन्माने ब्राह्मण असला तरी त्यांने वयाच्या ७ व्या वर्षीच बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती. उत्तम शिक्षक कसा अस-ावा? हे लक्षात घेऊन महाविद्यालयाला मिलिंद तर परिसराला नागसेनवन असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नांव दिले आहे. जाज्वल्य स्वाभिमान निर्माण व्ह-ावा म्हणून निष्क्रिय लोकांविषयी व्यक्त होताना तुम्ही जन्माला का आलात? असे प्रश्नार्थक बाबासाहेब बोलले होते. कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजात संघटना अनेक पहायला मिळत असल्या तरी त्यात संघटन मात्र नाममात्र असते, म्हणून समाजाची वाताहात होत आहे. ज्यांना जसे कळले तसे इतरांना बुद्ध, फुले शाहू आंबेडकर समजावून सांगितले पाहिजे. ज्याला कळेल तो वळेल. अन्याय अत्याचार करणाऱ्यापेक्षा सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. म्हणून प्रवाहाविरुद्ध कार्य करू शकलो तरच आपण समाजाला दिशा देऊ शकतो. अनेकांना आपली सत्ता हवी आहे, परंतु सत्ता हस्तगत करण्यासाठी पूर्ण कराव्या लागणाऱ्या अटी व शर्ती पूर्ण करायला त्या व्यक्ती तयार नसतात. परिणामी परिस्थिती जैसे थे, पहायला मिळते. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारतीय समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी सागितलेल्या विद्या, प्रज्ञा, करुणा, मैत्री व शील या पंचतत्त्वानुसार समाजमन घडविण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. तसेच पुढे जाऊन २० जुलै १९४२ ला सुशिक्षित करा, संघर्ष करा, संघटीत करा, आत्मविश्वास बळगा व कधीही धीर सोडू नका अशी पंचसूत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास दिली आहे. आता केवळ शिक्षीत होऊन चालणार नाही तर सुशिक्षित होऊन जबाबदारीने कर्तव्य पार पाडली पाहिजेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली पाहिजे. करिता आपण या प्रासंगिक विषयावर कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेचे प्रास्ताविक एड. विलास रामटेके व सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, उद्योजक मिलिंद बागूल, महादेव डांबरे, इंजिनिअर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, अर्पिता तुपे, इंजिनिअर भास्कर म्हस्के, प्रा. मंगला झिने, एड. रजनीगंधा राजूरकर, सुभाष ठोकळ, प्रा. विलास कटारे, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### ‘भरपाई टाळण्यासाठी कायद्याचे बेधडक उल्लंघन’; राज्य सरकारी अधिकाऱ्यांवर न्यायालयाचे ताशेरे

नवी दिल्ली : ‘मूळ जमीन मालकांना भरपाईपासून वंचित ठेवण्यासाठी महाराष्ट्र सरकारमधील अधिकाऱ्यांनी निर्लज्जपणे कायद्याचे उल्लंघन केले आहे,’ अशा शब्दांत ताशेरे ओढताना सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपूर्वी व्याजासह भरपाई करण्याचे आदेश बीड जिल्हा परिषदेला दिले आहेत. २० वर्षांपूर्वी अधिग्रहित झालेल्या जमिनीशी संबंधित हे प्रकरण आहे.

२००५ साली बीड जिल्ह्यातील जांभळखोरी भोरफडी गावात रोजगार हमी योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यासाठी या जमिनीचे सक्तीने अधिग्रहण करण्यात आले होते. मूळ जमीन मालकांना व्याजासह नुकसानभरपाई देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात जिल्हा परिषदेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सोमवारी न्या. सूर्य कांत आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने याचिका फेटाळून लावताना महाराष्ट्र सरकारच्या अधिकाऱ्यांची तीव्र शब्दांत कानउघाडणी केली. हे प्रकरण महाराष्ट्राच्या सरकारी अधिकाऱ्यांनी ज्या पद्धतीने हाताळले, ते बघून आम्ही पूर्णपणे निराश झालो आहोत, असे न्यायालयाने सुनावले.

# सहकार क्षेत्रात पुरुषाबरोबर महिलांनाही सामावून घेण्याचे शासनाचे धोरण : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे हस्ते ब्रम्हदेव दादा माने को-बँकेच्या २२ व्या शाखेचे उद्घाटन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : राज्याला सहकार चळवळ अत्यंत फायदेशीर ठरली असन या चळवळीत पुढील काळात पुरुषाबरोबरच महिलांनाही सामावून घेण्याचे शासनाचे धोरण आहे, व त्या दृष्टीने शासन पावले टाकत असल्याची माहिती राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

सोलापूर शहरातील अंत्रोलिकर नगर येथे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ब्रह्मदेव दादा माने सहकारी बँकेच्या २२ व्या शाखेचे उद्धाटन झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख, माजी आमदार दिलीप माने, प्राध्यापक शिवाजीराव काळुंगे, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड तसेच बँकेचे चेअरमन सोमनाथ गायकवाड, नवीन शाखेचे व्यवस्थापक विनोद कुलकर्णी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या सहकार विभागाच्या धोरणानुसार राज्यातील एक ही नागरिक सहकार चळवळीपासून वंचित राहणार नाही या दृष्टीने शासन प्रयत्न करत आहे. त्यासाठी पुढील काळात सहकार चळवळीत महिलांचाही समावेश महत्त्वपूर्ण असल्याचे सहकार मंत्री श्री. पाटील यांनी सांगून राज्यातील एक ही गरजू नागरिक सावकाराकडे पैशासाठी जाणार नाही यासाठी सहकार क्षेत्रातील सर्व बँकांनी प्रयत्न करावेत असेही त्यांनी आवाहन केले. तसेच सहकार चळवळीत प्रचंड मोठी ताकद असून त्या त्या भागात व्यापार, उद्योगधंदे यासह सर्वांगीण विकासाला भरघोस मदत यातून होऊ शकते व महाराष्ट्रातील अनेक भागात तसे घडलेले आहे व पुढेही याच पद्धतीने सहकार क्षेत्राने काम करावे असेही त्यांनी सांगितले.

सोलापूर येथे ब्रह्मदेव दादा सहकारी बँकेचे काम उत्कृष्ट असून यातून या भागातील गोरगरीब नागरिकांना वित्तीय सहाय्य मिळत असून हे काम बँकेने पुढेही तसेच चालू ठेवावे व अशीच प्रगती करावी, अशा शुभेच्छा सहकार मंत्री श्री पाटील यांनी दिल्या. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त करून बँकेच्या बावीसाव्या शाखेला शुभेच्छा दिल्या.

तर माजी आमदार दिलीप माने यांनी ब्रह्मदेव दादा सहकारी बँकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या केलेल्या कामाच्या प्रगती अहवाल प्रस्ताविकात मांडला. प्रारंभी फित कापून व त्यानंतर दीप प्रज्वलन करून सहकार मंत्री व मान्यवरांनी बँकेच्या शाखेचे उद्घाटन केले.

यावेळी माजी आमदार दीपक साळुंखे, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, चेअरमन राजेंद्र हजारे, सीईओ आशा हजारे यांची उपस्थिती होती.

### जनकल्याण सोसायटीला भेट-

**सदर बाजार येथील जनकल्याण मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन सोसायटीच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली व जनकल्याण सोसायटीने गोरगरीब नागरिकांना कर्ज पुरवठा करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावावी, असेही आवाहन त्यांनी केले.**

# जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : ६ जानेवारी हा दिवस राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी सन १८३२ मध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले.

या निमित्त जिल्हा माहिती कार्यालय येथे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जेष्ठ पत्रकार बाळासाहेब वाघमोडे, योगेश तुरेराव, अनिल शिराळकर, श्री शैल चिंचोळीकर, विश्वनाथ व्हनकोरे, कर्मचारी शरद नलवडे, संजय घोडके, भाऊसाहेब चोरमले, प्रविण चव्हाण, पंकज बर्दापूरकर आदि उपस्थित होते.

# भुरिकवठे येथील ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालयात ग्रंथ प्रदर्शन व वाचन स्पर्धा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी : भुरीकवठे तालुका अक्कलकोट येथील ज्ञानदान सार्वजनिक मोफत वाचनालयात मध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन जि प प्राथमिक मराठी केंद्र शाळा भुरीकवठे येथील प्रमुख चव्हाण गुरुजी यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले यावेळी जि प प्राथमीक मराठी शाळेचे शिक्षिका शेख मॅडम संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब कलशेट्टी सचिव चंद्रकांत पोतदार ग्रंथापाल वंदना पोतदार सहाय्यक ग्रंथपाल संजय सोलापूर अभिषेक पोतदार शेखर स्वामी आधी जण उपस्थित होते.

प्रारंभी संस्थेचे सचिव प्रा.चंद्रकांत पोतदार यांनी उपस्थितांचे स्वागत करून आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेची थोडक्यात माहिती सांगितली तर नंतर उपस्थित बालकांनी विद्यार्थ्यांनी संस्थेतील उपलब्ध बालवांग्मयाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. चव्हाण गुरुजी यांनी देखील आपल्या मनोगता मधून संस्थेकडील उपलब्ध २४००० ग्रंथ संपदा ७५ दरमहा मासिके पाक्षिके दुमजली इमारत तीन कॉम्प्युटर पाहून संस्थेच्या स्तुत्य उपक्रमाची आश्चर्य वाटून कौतुकही केले त्यानंतर संस्थेच्या स्वर्गीय माणिक; स्वर्गीय भाऊराव; स्वर्गीय स्वातंत्र्यसैनिक रामचंद्र पोतदार सभागृहामध्ये विद्यार्थ्यां ची वाचन स्पर्धा घेण्यात आली २५ विद्यार्थी या स्पर्धेमध्ये भाग घेतले होते दिनांक २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना व दोन उत्तेजनार्थ म्हणून बक्षीस देण्याचे संस्थेने जाहीर केले.संजय सोलापुरे यांनी शेवटी उपस्थितांचे आभार मानले.

### पुस्तकांशी मैत्री करा जीवनात यशस्वी व्हाल : प्रा.चंद्रकांत पोतदार

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉक्टर विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसा निमित्ताने मातोश्री वृद्धाश्रमामध्ये मिष्टान्न भोजन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सचिव डॉक्टर विश्वासराव आरोटे यांच्या वाढदिवसा निमित्तानं पंढरपूर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमामध्ये मिस्ट अन्नभोजन भोजन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, नुतन शहर अध्यक्ष संतोष मोरे, ता. अध्यक्ष रविंद्र कोळि, मातोश्री वृद्धाश्रमाचे मॅनेजर धनाजी राक्षे, ह भ प राधेश बादले पाटील, नितीन खाडे, किशोर काकडे, संजय ननवरे, सुदाम मोरे, रवी कोळी,म. रा. प. संघाचे माजी ता. अध्यक्ष रामदास नागटिळक, नागेश अदापुरे, सचिन कुलकर्णी,दादा कदम, मनोज पवार, लक्ष्मण शिंदे, राजेद्र करपे, सुनिल कोरके,बाळासाहेब काशीद, तसेच, कुमार कोरे, संजय यादव, संजय ननवरे, धनाजी राक्षे, प्रमोद भोसले, शंकर कदम तसेच इतर पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत सेना महाराज नाभिक समाज संस्था वतीने दिनदर्शिका प्रकाशन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : श्री संत सेना महाराज मंदिर अक्कलकोट येथे हुतात्मा वीर विठ्ठलराव कोतवाल यांच्या पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्र नाभिक महामंडळ व श्री संत सेना महाराज नाभिक समाज बहुउद्देशीय संस्था अक्कलकोट आयोजित सन २०२५ दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न,

अक्कलकोट नगरीचे मा. नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी, मा नगरसेवक महेश हिडोळे, मा. नगरसेवक बाळासाहेब शिंदे, जिल्हा अल्पसंख्याक अध्यक्ष मा. ननु कोरबु, आरपीआयचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखबे, डॉ अमृतराव सुरवसे कवी अणूर, पक्षिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुदर्शन विभूते, यांच्या उपस्थित सन २०२५ दिनदर्शिका चे प्रकाशन व श्री संत सेना महाराज बहुउद्देशीय संस्थाचे नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आले

सर्व प्रथम महात्मा विठ्ठलराव कोतवाल यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र नाभिक महामंडळ राज्य उपाध्यक्ष वैभव शेटे सर, होते त्यासगी जिल्हा कार्याध्यक्ष भागवत विभूते, सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष श्री आनंद वाघमारे ,शहर अध्यक्ष श्रीकांत राऊत, कोर कमिटी चे सहदेव वाघमारे, बापूराव काळें ,राकेश कोरे, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर सुरवसे, महिला अध्यक्षा छाया मोरे, अक्कलकोट तालुका युवती महिला अध्यक्षा भाग्यश्री काळे, तालुका युवक अध्यक्ष श्रीशैल सुरवसे, शहर अध्यक्ष लक्ष्मण विभूते, शहर युवा अध्यक्ष व्यंकट विभूते, उपाध्यक्ष राजेश कोरे ,खजिनदार प्रविण राऊत, सचिव महेश सुरवसे ,समाज पंच पद्माकर डिगे, प्रभाकर सुरवसे, सोमनिंग सुरवसे, अरुण विभूते, श्रीकात विभुते, नरसिंह सिरसागर ,ता. सल्लागार बाळकृष्ण कोरे, खजिनदार पुंडलीक कोरे, उपाध्यक्ष गंगाराम शाबादे, ता .सल्लागार महादेव भाले, युवक उपाध्यक्ष निंगप्पा कोरे, उपाध्यक्ष दत्ता वाघमारे, उपाध्यक्ष गोपी सुरवसे, मल्लिनाथ विभूते, उपाध्यक्ष योगीनाथ नाव्ही, उपाध्यक्ष प्रभाकर कोरे ,सह सचिव संजय नारायण सुरवसे, नागेश कोरे, प्रशांत विभूते, युवक उपाध्यक्ष मंजुनाथ हडपद, मंजुनाथ अकलगी, मैदगी शहर अध्यक्ष अनिल विभूते, युवक उपाध्यक्ष अपू ढगे, भिम जाधव, आकाश सुरवसे, निरंजन सिरसागर ,गोविंद मोरे, रघुनाथ सिरसागर, चंद्रकांत घाटे, सचिन लोखंडे, अशोक भाकरे, सिद्धाराम भाकरे, संदिप भाले, राजेंद्र सुरवसे, अमर सुरवसे, काशिनाथ विभूते, सोनल सुरवसे, बाळकृष्ण विभूते, सुनिल विभूते, लखन चिकले, अनिल सुरवसे, सुधीर वाळके, गणेश राऊत, लक्ष्मीपुत्र विभूते, शिवचलप्पा विभूते, मधुकर सुरवसे, लक्ष्मण सुरवसे, ज्ञानेश्वर काळे, सागर जमदाडे, सुनिल जमदाडे, नागेश सुरवसे, भाग्येश यमाजी, कल्पना कोरे, आहिल्या विभूते, कुसुम वाळके, उपस्थित होते सुत्रसंचलन सुभाष सुरवसे सर (कर्मचारी महासंघाचे अक्कलकोट ता अध्यक्ष) यांनी केले आभार शिवशरणप्पा सुरवसे (अध्यक्ष महाराष्ट्र नाभिक महामंडळ ता अक्कलकोट) यांनी मानले

**मध्यरात्री ते पहाटेच्या दरम्यान झाली दगडफेक**

**तक्रार करताच पेट्रोलिंगची गाडी घटनास्थळी दाखल**

# पत्रकार दिनाच्या दिवशीच पत्रकारांच्या घरावर हल्ला ! इंदापूर चा बिड होतोय का ?




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापुर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील निमसाखर येथील पत्रकार सत्यजीत रणवरे व संभाजी रणवरे यांच्या घरा वरती अज्ञात इसमान कडून ०६ जानेवारी रोजी पहाटे ०२:३० ते ०३:०० वाजले च्या सुमारास दगडफेक करण्यात आली. सुदैवाने यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही.

निमसाखर येथील लोकमतचे पत्रकार सत्यजीत रणवरे व संभाजी रणवरे यांच्या राहत्या घरावरती ०२:३० च्या सुमारास दगड फेकण्यात आले.घरा वरती दगड पडत असताना सत्यजीत रणवरे यांनी शेजारील नवनाथ रणवरे, अजित रणवरे, राजेंद्र रणवरे यांना फोन करून याची कल्पना दिली. त्यानंतर सर्वजण बाहेर आले मात्र तो पर्यंत सदरील अज्ञात इसम फरार झाले होते.

सत्यजीत रणवरे हे निमसाखर मधील जलजीवन मिशन योजने च्या कामा संदर्भातील त्रुटी व नियमबाह्यते बाबतीत अमरण उपोषण करणार असल्याने तसेच इतर अवैध व्यवसायाच्या बातम्या वारंवार प्रसिद्ध करीत असल्यानेच अशा प्रकारे भ्याड हल्ला समाजकंटका कडून करण्यात आला आहे.या हल्लयाची माहिती वालचंदनगर पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे यांना कल्पना देताच पंधरा मिनिटांत वालचंदनगर पोलीस स्टेशनची पेट्रोलिंग ची गाडी घटना स्थळी पोहचली.

सत्यजीत रणवरे व संभाजी रणवरे यांच्या घरा वरील हल्लयाच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करीत पत्रकार आघाडी कडून वालचंदनगर पोलीस स्टेशनला या घटनेच्या निषेधाचे निवेदन देण्यात आले असून अशा समाजकंटकाच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करुन दगड फेक करणारा गुन्हेगार व त्यांच्या मागचा आका शोधुन त्याच्यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या पत्रकार आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष सदस्य संतोष दहिदुले, इंदापूर तालुका अध्यक्ष शिवाजी पवार, प्रसिद्धी प्रमुख अतुल सोनकांबळे, सलिम शेख, भिमसेन उबाळे, महेश कळसाईत, गणेश कांबळे, संतोष कदम, अमोल रजपूत, आदी पत्रकार उपस्थित होते.

## थोडक्यात...




### जुना पुना नाका ब्रिजवर झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर मार्केटयार्डाकडून मोहोळकडे आपल्या भावासह दुचाकीवरून जाणाऱ्या दुचाकीस्वारास धडक देऊन व त्याच्या भावाच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकाच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हाकिकत अशी की, फिर्यादी मल्लेश श्रीनिवास दिकोंडा (वय-२५, रा.आकाशवाणी केंद्राजवळ, एमआयडीसी सोलापूर) हे आपल्या भावासह दुचाकीवरून २५ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास मोहोळकडे जात असताना जुना पुना नाका ब्रिजवर समोरून येणाऱ्या वाहन चालक सतीश गाडपिले (रा.देसाई नगर, एमआयडीसी, सोलापूर) यांनी आपल्या ताब्यातील वाहन निष्काळजी पणाने चालविल्याने फिर्यादी जखमी झाला. तर त्याच्या पाठीमागे बसलेला भाऊ मार लागून गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. घटनेचा तपास स.पो.निरीक्षक पाटील हे करत आहेत.

# 'महाराष्ट्राची पहिली आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकेथॉन'चे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते उद्घाटन

## पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता या भविष्यवेधी संकल्पनेची निवड योग्य : राज्यपाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/कमलाकर सोनकांबळे : पत्रकार संघटनेने यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही नाविन्यपूर्ण आणि भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे; आज 'एआय' ही माध्यमांसहित सर्व उद्योगांमध्ये एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली असताना ही निवड योग्यवेळी आणि महत्त्वाची आहे, असे मत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केले.




मराठी पत्रकार संघाच्यावतीने हॉटेल जे. डब्ल्यू. मेरियट येथे आयोजित 'महाराष्ट्राची पहिली आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकेथॉन' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पुढारी समूहाचे अध्यक्ष योगेश जाधव, दैनिक लोकमतचे समूह संपादक विजय बाविस्कर, रुपेरी किनार फाउंडेशनच्या संस्थापक कल्पना जावडेकर, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी आदी उपस्थित होते.

मराठी पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला या हॅकेथॉनला उपस्थित राहताना आनंद होत असल्याचे सांगून राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, आजचा दिवस राज्याच्या पत्रकारिता क्षेत्रासाठी विशेष महत्त्वाचा आहे. राज्यातील पत्रकारितेच्या उल्लेखनीय प्रवासाचे स्मरण करताना, आपण त्याच्या समृद्ध वारशावर आणि या सतत विकसित होत असलेल्या परिस्थितीत पुढे जाण्याच्या मार्गावर प्रकाश टाकला पाहिजे.

बाळशास्त्री जांभेकर यांनी आपल्या दूरदृष्टीने ६ जानेवारी १८३२ रोजी पहिले मराठी वृत्तपत्र दर्पणच्या रूपाने महाराष्ट्रातील पत्रकारितेचा पाया रचला, त्यांचा वारसा महाराष्ट्रातील पत्रकारांना आजही प्रेरणा देत आहे. दरवर्षी हा दिवस साजरा करण्यासाठी सर्व पत्रकार आणि मराठी पत्रकार संघटनेच्या कौतुकास्पद प्रयत्नांबद्दल राज्यपालांनी शुभेच्छा दिल्या.

आज नवीन घडामोडीला कोणीही थांबवू शकत नाही. एआयमुळे सर्व क्षेत्रात शास्त्रीय विकास होणार आहे. पूर्वी वायरच्या सहाय्याने होणारा दूरसंचार नंतर वायरलेसच्या माध्यमातून, त्यापुढील काळात सॅटेलाईटच्या तर आताच्या काळात संगणक अशा माध्यमातून होत आहे. 'एआय' हे माध्यम असले तरी बातमी देणारा पत्रकार हा नि:पक्षपाती असला पाहिजे. पत्रकारांकडून सत्य आणि नि:पक्षपाती वृत्तांकनामुळे भारतीय लोकशाही अधिक सुदृढ होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

घटना जशी असेल तशी जनतेपर्यंत पोहोचविल्यास आपली प्रगती घडून येणार आहे. २०२७ पर्यंत विकसित भारत होण्याचे लक्ष्य हे देशाच्या नागरिकांपर्यंत जोपर्यंत सत्य पोहोचत नाही पूर्ण होऊ शकणार नाही. त्यासाठी प्रतिभावान पत्रकार महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. पत्रकार भीतीशिवाय, सत्याच्या बाजूने तसेच समाजाच्या कल्याणासाठी लिहितात, अवैध काम करणाऱ्यांना उघडे पाडत असल्यामुळे प्रशासनाला त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी लागते.

जेव्हा आपली हृदयापासून खात्री होते तेव्हा जिज्ञासू वृत्ती तयार होते. सुरुवातीला आपल्या कार्याला स्वीकारले गेले नाही तरी काम करत राहिल्यास एक ना एक दिवस जनता आपल्याकडून चांगल्या बाबी नक्कीच स्वीकारेल. त्यासाठी जनतेसमोर काम करण्याचे, सत्य सांगण्याचे आणि सत्य प्रस्थापित करण्याचे धैर्य आपल्याकडे असले पाहिजे, असा सल्ला राज्यपालांनी यावेळी दिला.

आपण आधुनिक आर्थिक विकास तसेच आधुनिक शास्त्रीय विकासाला स्वीकारणे आवश्यक आहे. पत्रकारितेत एआय-चालित नवोपक्रमांना चालना देण्याच्या दृष्टिकोनावर ही कार्यशाळा आधारित आहे. युवकांना, ते जनतेपर्यंत सत्य कसे पोहोचवू शकतात हे माहिती झाले पाहिजे. यादृष्टीने या हॅकेथॉनमध्ये अनेक अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्याच्या प्रयत्न अतीशय चांगला आहे. या हॅकेथॉनच्या माध्यमातून जनतेपर्यंत सत्य पोहोचविणारे दहा नागरिक जरी निर्माण करु शकलो तरी ते खूप मोठे यश असेल.

मराठी भाषा महान भाषा असून तीला आपली स्व:ताची संस्कृती आणि वारसा आहे. ही एक सर्वात जुन्या भाषेपैकी असून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे त्यांनी आभार मानले.

पत्रकारिता ही भयापासून, मर्जीपासून आणि सत्याशिवाय अन्य कोणत्याही बाबीपासून मुक्त असली पाहिजे. ज्यात या देशाचे खरे यश सामावलेले आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. जाधव, श्री. बाविस्कर तसेच श्रीमती जावडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. किरण जोशी यांनी स्वागत केले.

यावेळी राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांना सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन सन्माणित करण्यात आले.

कार्यक्रमात 'संपादक व्रतस्त पुरस्कार' पुढारी समूहाच्या संपादक स्मीता योगेश जाधव, दैनिक लोकमतचे यदू जोशी, दै. सकाळच्या कार्यकारी संपादक शीतल पवार, न्यूज १८ लोकमतचे संपादक विलास बढे यांना देण्यात आले. तसेच विशेष पुरस्कार रुपेरी किनारच्या श्रीमती कल्पना जावडेकर, एड्यूटेकचे निलेश खेडेकर यांना देण्यात आले.

हॅकेथॉनमध्ये उत्कृष्ट काम केलेल्या महाविद्यालयांना पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

यावेळी विविध माध्यमांचे पत्रकार, पत्रकारिता अभ्यासक्रमाचे तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते.




## जिल्हास्तरीय कला-क्रीडा अविष्कारमध्ये नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळेची उत्तम कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोदिंया : शहराला लागून असणारी नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळेने

**दोन दिवसीय कला व क्रीडा अविष्कार संपन्न; जास्त प्रावीण्य प्राप्त**

समाज कल्याण गोदिंया विभागाच्या दोन दिवसीय कला व क्रीडा अविष्कारमध्ये सदर शाळेचे अलौकिक प्रदर्शन दाखवून उत्तम कामगिरी केली आहे.

याप्रसंगी मंचावर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विनोद मोहतूरे, लेखाधिकारी संजय भांडारकर, स्वाती कापसे, आशिष जांभूळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्ह्यातील तीनही शाळांचे जिल्हास्तरीय क्रीडा व कला अविष्कार कार्यक्रम यामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री या शाळेने सांघिक खेळ खो खो, रस्सीखेच, रिले यामध्ये प्रथम क्रमांक वयोगट १४ व १७ यांनी प्राप्त केला. तसेच वैयक्तिक खेळामध्ये थाळी फेक, लांब उडी, १००,२००,४०० मीटर धावने यामध्ये प्रथम क्रमांक मिळविले आहे. या सर्व क्रीडा स्पर्धांचे मार्गदर्शक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले असून कार्तिक शहारे यांनी सहकार्य केले.

विजयी सर्व चमूचे व खेळाडूंचे विभागीय स्तरावर निवड झालेली आहे. विजय मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थी यांचे शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, प्रदीप ढवळे, तुषार महाजन, प्रगती खोब्रागडे, स्वाती राणा, अर्चना चव्हाण यांनी मन भरून अभिनंदन व कौतुक केले.

## स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा 'अविष्कार-२०२४' मध्ये यशस्वी सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने पुन्हा एकदा संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात यशाची नवी उदाहरणे सादर केली आहेत. विद्यापीठस्तरीय स्पर्धेत स्वेरीच्या दोन प्रकल्पांची निवड राज्यस्तरीय 'अविष्कार २०२४' साठी झाली आहे. या यशाबद्दल स्वेरीतील संशोधकांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.




**अविष्कार २०२४ स्पर्धते स्वेरीच्या पीएच.डी. मधील प्रा.अमितकुमार शेलार यांनी पीपीजी गटात प्रथम क्रमांक मिळविल्या बद्धल त्यांच्या पु.अ.हो.सोलापूर विद्यापिठाचे प्र- कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी डावीकडून सोविसो च्या अविष्कार चे समन्वयक डॉ. सतीश काशिद, डॉ. धुळप, प्रमुख पाहुणे मदन केशव रेड्डी तर दुसऱ्या छायाचित्रात स्वेरीच्या रोहित पवार यांनी युजी गटात दुसरा क्रमांक मिळविला याबद्धल त्यांचा स्वेरीच्या वतीने देखील गौरव करताना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे सोबत उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी मधील 'अविष्कार'चे समन्वयक प्रा. दिग्विजय रोंगे.**

'स्वेरी' हे संशोधन आणि नवोपक्रमशील संस्कृतीचे प्रतीक आहे हे आता सर्वश्रुत आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत विद्यापीठस्तरीय 'अविष्कार २०२४' ही संशोधन स्पर्धा सोलापूर मधील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये आयोजित केली होती. या स्पर्धेत पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या ३० हून अधिक महाविद्यालयांतील ४१४ संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे संयोजन डॉ. रश्मी दीक्षित आणि डॉ. सतीश काशीद यांनी केले. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ प्रदान करणारी ठरली. यामध्ये स्वेरीच्या दोन प्रकल्पांनी उल्लेखनीय कामगिरी केली. स्वेरीच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात पीएच.डी. अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेले प्रा.अमितकुमार रामचंद्र शेलार यांनी प्युअर सायन्सेस (पीपीजी) गटात पहिला क्रमांक मिळवला. त्यांना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणारे रोहित शंकर पवार यांना कृषी (युजी) गटात दुसरा क्रमांक मिळाला. त्यांना संशोधन अधिष्ठाता डॉ. ए. पी. केने यांचे मार्गदर्शन लाभले. 'अविष्कार २०२४' स्पर्धे करिता समन्वयक म्हणून प्रा. दिग्विजय रोंगे यांनी काम पाहिले. यशस्वी संशोधक विद्यार्थ्यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी व पालक यांनी अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी विजेत्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन केले व त्यांचे कष्ट आणि नाविन्यपूर्ण विचारांची प्रशंसा केली. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे आणि प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. दामा म्हणाले की, 'अविष्कार मध्ये विजेतेपद मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तयारी करावी. आणि त्यात देखील यश खेचून आणावे.' असे सांगून उपयुक्त मार्गदर्शन केले. सन २००६ साली महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल एस.एम. कृष्णा यांच्या पुढाकाराने विद्यापीठस्तरीय 'अविष्कार' ही संशोधनात्मक स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये घेण्यात येते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणांना चालना देणे, त्यांच्यामधील संशोधनवृत्ती जोपासणे, नाविन्यपूर्ण विचारांसाठी प्रोत्साहित करणे आणि संशोधनाच्या गुणवत्तेत सुधारणा घडवणे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची ठरली आहे. युनिव्हर्सिटी स्तरावरील या स्पर्धेत प्युअर सायन्सेस, कृषी, ह्युमॅनिटीज, इंजिनिअरिंग अशा विविध श्रेणींमध्ये युजी, पीजी आणि पीपीजी स्तरावरील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी निवडलेले प्रकल्प आता राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करतील. स्वेरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनाचा गौरव सर्व स्तरातून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये मिळविलेले यश महाविद्यालयातील संशोधन आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे परिमाण आहे, तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलतेचा आणि ज्ञानाचा शोध घेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे, हे मात्र निश्चित!

**रस्त्यावर पडले मोठमोठाले खड्डे, पुलाला भले मोठे भगदाड**

**बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, लोकप्रतिनिधी देतील का लक्ष!**

# मेरा बुद्रूक ते अंढेरा रस्त्याची दुरावस्था, वाहनधारक त्रस्त





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


कैलास आंधळे/चिखली तालुका प्रतिनिधी : दळणवळणाच्या दृष्टीने खेडेपाड्याचे रस्ते हे मुख्य श्वास म्हणून ओळखले जातात.मात्र हे केवळ कागदोपत्री आहे,की काय असा प्रश्न आता गावगाड्या पासून ते शहरापर्यंत सर्वांनाच पडू लागला आहे.लालफितीचा कारभारामध्ये रस्ता नावाच्या कामासाठी प्राधान्य द्यावे लागते हे कोणाच्याच गावी नसावे, अशी स्थिती खेड्या गावातून अनेक वाहनधारका सह नागरिकांना प्रश्न पडत आहे.

**संबंधित विभागाचे दुर्लक्ष व लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्यामुळेच, अनेक रस्त्याच्या कामामध्ये ठेकेदार रस्त्याच्या कामात करत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळेच अनेक रस्ते हे दोन, तीन वर्षात उखडून वाहनधारकांना त्याचा नाहक त्रास होत आहे.वाहनाचा रोड टॅक्सच्या नावाने लाखो रुपये भरायचे खराब रस्त्यावरून ते वाहन चालून मेंटेनेस च्या नावाने हजारो रुपयांचा आर्थिक फटका सहन करायचा, तरी वेळेत संबंधित विभाग व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द, मेरा बुद्रुक ते अंढेरा रस्त्याची दुरुस्ती होणे गरजेचे आहे.**

**- सुनिल चेके**
**वाहन धारक मेरा बुद्रुक**

चिखली तालुक्यासह देऊळगाव राजा तालुक्यातील रस्त्यावर अनेक ठिकाणी रस्त्यावर पुन्हा पुन्हा मलम पट्टी करायची...... लाखो रुपयांचा चुराडा प्रत्यक्ष एका पावसात रस्त्याची वाट लागते अशा बोलक्या प्रतिक्रिया गावगावाच्या तरुणाई पासून वयाची पंच्याहत्तरी ओलांडलेल्या आजोबा पर्यंत व्यक्त करण्यात आल्या.वर्षात एकाच मार्गावरील रस्त्यावर तीन तीन वेळा दुरुस्ती करायची आणि बिले उचलत असल्याचेही लोकांमध्ये कुजबूज आढळून आली.या साऱ्या प्रकारांमध्ये काही अपवाद वगळले तर खडीचा पत्ता नाही.......खड्ड्याची तर गिनतीच नाही.अनेक ठिकाणी कधीकाळी केलेले डांबरी केव्हाच वाहून गेल्याचे चित्र दिसून आले.त्याचाच भाग म्हणून मेरा बुद्रुक ते मेरा खुर्द,मेरा बुद्रुक ते अंढेरा,मेंडगाव ते सावखेड नागरे, अंढेरा ते सावखेड नागरे असे अनेक गावातील खड्डेमय रस्त्यामुळे वाहनधारक त्रस्त होऊन अनेकांना मणक्याचे आजार झाल्याचे समोर येत आहे.काही वर्षांमध्येच मेरा बुद्रुक ते अंढेरा रस्त्याची दयनीय अवस्था झाली, रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठाले खड्डे, तर एका पुलाला मोठे भगदाड पडले तरी संबंधित विभागा एखाद्या वाहनधारकाचा जीव जाण्याची वाट तरी पाहत नाही ना असा प्रश्न वाहनधारकांकडून उपस्थित होत आहे.काही रस्त्यावर देखभाल दुरुस्तीचे नुसते कागदी घोडे नाचले की काय अशी शंका सुद्धा उपस्थित होत आहे, तरी संबंधित बांधकाम विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधीनी वेळीच लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी,अशी मागणी मेरा बुद्रूक, मनुबाई, गुंजाळा, अंढेरा ह्या गावातील ग्रामस्थ करीत आहे.

## शिधापत्रिकांचे काम तीन महिन्यापासून बंद; नागरिकांमध्ये प्रचंड मनस्ताप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदर :संपूर्ण राज्यामध्ये शिधापत्रिकेसंबंधी सर्व कामासाठी गेले तीन महिने ब्रेक लागलेला आहे.

प्रशासन या कडे वेळी च पाहील का. नागरिक हेलपाटे मारून त्रस्त झाले आहेत. पुरवठा विभागातर्फे अन्न धान्य वितरण हे ऑनलाईन पद्धतीने पहिले जाते.

नवीन शिधापत्रिका काढणे, नवीन नाव वाढवणे,पत्ता बदलणे,इतर अनेक कामे ऑनलाईन केली जातात. ऑनलाईन शिष्टम बंद असल्याने नागरिकांची प्रचंड गैर सोय होत आहे. याकडे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून नागरिकांची होणारी धावपळ थांबवावी.व लवकर ऑनलाईन शिष्टम चालू करावी, अशी सर्वसामान्य जनतेची मागणी आहे.